शिल्पकार विकासाचा...

# देशदूत

इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | नंदुरबार | वर्ष २७ । अंक ३२१ । रविवार, दि.३ ऑगस्ट २०२५ । पाने-८ | किंमत ₹ ५ | मोबाईल आवृत्ती वाचा Android व Apple वर

मुळव्याध, फिशर, भगंदर
इंजेक्शन व लेझरद्वारे उपचार
✓ संडासद्वारे रक्त पडणे व कोंब येणे
✓ गुदमार्गाच्या ठिकाणी खाज, सुज आग व वेदना होणे
✓ गुदमार्ग लहाण होणे ✓ गुदद्वाराजवळ सेप्टीक होणे
✓ माकड हाडाजवळ, खाज, गाठ किंवा पु होणे
कॅशलेस व मेडिक्लेम सुविधा उपलब्ध.
कृपया येतांना अपॉईंमेंट घेऊन येणे...
डॉ.मनोज पाटील
M.S. [Shalya] | F.A.R.C.S. | जनरल सर्जन व गुदविकार तज्ञ
लोढा हॉस्पीटल, जिल्हा बँकेजवळ, रिंग रोड, जळगांव. 70302 33533

## राऊतांचे सरन्यायाधीशांना पत्र

**मुंबई ।** शिवसेना ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी सरन्यायाधीश भूषण गवई यांना पत्र लिहून त्यांचे अभिनंदन केले आहे. तेलंगणामधील दहा आमदाराच्या पक्षांतर प्रकरणात आपल्या खंडपीठाकडून परखड मत व्यक्त करण्यात आले, आपले निरीक्षण अंधारात ढकललेल्या लोकशाहीला आशेचा किरण दाखवणारे आहे, मूळ राजकीय पक्षाशी बेइमानी करून पक्षांतर करणाऱ्यांना रोखले नाही तर लोकशाहीचे नुकसान होईल, त्याबद्दल आपले अभिनंदन असे संजय राऊत यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे.

# टॅरिफला स्वदेशीची टक्कर

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाराणसीतून हुंकार



**वाराणसी ।** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी नुकतेच भारत आणि रशियाला मृत अर्थव्यवस्था असे संबोधले होते. रशियाकडून तेल खरेदी केल्याबद्दल ट्रम्प यांनी भारतावर २५ टक्के कर आणि दंडाची घोषणा केली आहे. त्यानंतर आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वाराणसी येथे बोलत असताना भारताच्या अर्थव्यवस्थेबाबत मोठे विधान केले आहे. तसेच देशातील लोकांनी यापुढे नवीन वस्तू घेताना स्वदेशी मालाला पसंती द्यावी, स्वदेशी वस्तू विकत घ्याव्यात, असे आवाहनही केले. डोनाल्ड ट्रम्प यांना अप्रत्यक्ष प्रत्युत्तर देताना पंतप्रधान मोदी म्हणाले, भारत जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्याच्या तयारीत आहे. भारताने आपल्या आर्थिक हितसंबंधाबद्दल जागरूक राहायला हवे. तसेच स्वदेशी उत्पादनांवर भर देत पुढे गेले पाहिजे. वाराणसी येथे बोलत असताना पंतप्रधान मोदी म्हणाले, जागतिक पातळीवर अस्थिरतेचे वातावरण आहे.

**यापुढे फक्त स्वदेशी वस्तू विकत घ्या!**

पंतप्रधान नरेंद्र मोदी पुढे म्हणाले, आपले सरकार देशाच्या विकासासाठी जे काही करू शकते, ते करत आहे. ज्यांना देशाचा विकास करायचा आहे आणि ज्यांना भारताला जगातील सर्वात मोठी तिसरी अर्थव्यवस्था म्हणून पाहायचे आहे. त्यांनी आपले मतभेद बाजूला ठेवून स्वदेशी उत्पादनांसाठी आग्रही राहिले पाहिजे. यासाठी कोणताही राजकीय पक्ष असो, राजकीय नेता असो त्यांनी मतभेद बाजूला ठेवून स्वदेशीचा संकल्प स्वीकारला पाहिजे. ज्या वस्तू बनविण्यासाठी भारतीय माणसाचे हात लागले आहेत. भारतीय व्यक्तीने वस्तू बनवताना आपला घाम गाळला आहे. अशा वस्तू स्वदेशी आहेत. आपण मेक इन इंडिया वस्तूच विकत घेतल्या पाहिजेत, असा संकल्प करूया. आतापासून जे काही नवीन सामान आपण घेऊ, ते स्वदेशीच असले पाहिजे, असेही त्यांनी सांगितले.

### दहशतवाद्यांना मारण्यासाठी तुमची परवानगी घेऊ का?

अखिलेश यादव यांच्या संसदेतील वक्तव्याचा संदर्भ देत मोदी म्हणाले की समाजवादी पक्षाचे नेते संसदेत विचारतात की, पहलगामच्या दहशतवाद्यांना आत्ताच का मारले? मग आम्ही काय करायला हवे? त्यांना मारण्यापूर्वी समाजवादी पक्षाच्या लोकांना फोन करून विचारायचे का? तुम्हाला विचारू का, की त्यांना कधी मारायचे आहे? दहशतवाद्यांना मारण्यासाठी मुहूर्त शोधावा लागेल का? त्यांना पळून जाण्याची संधी द्यायची आहे का? पंतप्रधानांनी आपला हल्ला अधिक तीव्र करत समाजवादी पक्षाच्या पूर्वीच्या सरकारवर गंभीर आरोप केले. ते म्हणाले, हे तेच लोक आहेत, जे सत्तेत असताना दहशतवाद्यांना क्लीन चिट देत होते. बॉम्बस्फोट करणाऱ्या दहशतवाद्यांवरील खटले मागे घेत होते. आता त्यांना दहशतवादी मारले गेल्याने त्रास होत आहे, ऑपरेशन सिंदूर यशस्वी झाल्याने त्रास होत आहे.

## माजी पंतप्रधानांच्या नातवाला जन्मठेप



**नवी दिल्ली ।** बलात्कार प्रकरणात दोषी ठरवण्यात आलेला माजी खासदार प्रज्ज्वल रेवण्णाला जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली आहे. न्यायालयाने रेवण्णाला १ ऑगस्टला दोषी ठरवले होते. त्यानंतर आज त्याला शिक्षा सुनावण्यात आली. न्यायालयाचा निकाल ऐकताच रेवण्णा भावुक झाला. त्याला रडू कोसळले. लोकप्रतिनिधींशी संबंधित प्रकरणांच्या सुनावणींसाठी स्थापन करण्यात आलेल्या विशेष न्यायालयाने रेवण्णाला शिक्षा सुनावली. न्यायालयाने प्रज्ज्वल रेवण्णाला भारतीय दंड सहितेच्या कलम ३७६ (२) (के) आणि ३७६ (२) (एन) च्या अंतर्गत शिक्षा सुनावली आहे. सोबतच न्यायालयाने त्याला १० लाखांचा दंडदेखील ठोठावला आहे. पीडितेला ७ लाख रुपयांची भरपाई देण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहे. ही शिक्षा आजपासून लागू झालेली आहे. प्रज्ज्वल रेवण्णा हा माजी पंतप्रधान एच. डी. देवेगौडा यांचा नातू आहे. १९९६ मध्ये ते पंतप्रधान झाले होते. पण त्यांचा कार्यकाळ वर्षभरापेक्षा कमी राहिला. प्रज्ज्वल रेवण्णा विरोधात बलात्कार प्रकरणात न्यायालयात एक सीडी महत्त्वाचा पुरावा म्हणून न्यायालयात सादर करण्यात आली. माजी खासदाराने त्याच्या घरात काम करणाऱ्या मोलकरणीवर दोनदा बलात्कार केल्याचा आरोप होता. पीडितेने घटनेचं व्हिडीओ चित्रीकरण केले. अत्याचार होत असताना अंगावर असलेली साडीदेखील तिने पुरावा म्हणून जपून ठेवली. पोलीस तपासात या साडीवर स्पर्म सापडले. त्यामुळे प्रज्ज्वल विरोधात अतिशय ठोस पुरावा मिळाला. या संपूर्ण प्रकरणाच्या सुनावणीत साडी महत्त्वाचा पुरावा ठरली. प्रज्ज्वल रेवण्णा विरोधात भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांच्या अंतर्गत आरोप झाले होते. न्यायालयाने रेवण्णाला कालच दोषी ठरवले.

### कानबाई उत्सव



### थोडक्यात

## कामगार विभागात भगवान विश्वकर्मा यांची जयंती

**मुंबई ।** कामगार विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या सर्व कार्यालयांमध्ये भगवान विश्वकर्मा यांची जयंती दरवर्षी १७ सप्टेंबर रोजी साजरी करण्यात यावी, असे निर्देश कामगार मंत्री ड.आकाश फुंडकर यांनी दिले आहेत. त्यानुसार विभागाच्या सर्व कार्यालयांमध्ये भगवान विश्वकर्मा यांची प्रतिमा लावण्यात येणार असून त्या प्रतिमेचे पूजन करून जयंती उत्साहात साजरी केली जाणार आहे. मात्र, जर १७ सप्टेंबर रोजी शासकीय सुट्टी असेल तर जयंती पुढील कार्यदिवशी साजरी करण्यात यावी, अशी सूचना फुंडकर यांनी दिली आहे.

## कामायनी एक्सप्रेसच्या इंजीनला आग

**नाशिक ।** कामायनी एक्स्प्रेसच्या इंजिनला शनिवारी दुपारी आग लागली. चालकाने दाखवलेल्या प्रसंगावधानामुळे आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले. या घटनेमुळे मुंबईहून नाशिकच्या दिशेने जाणाऱ्या रेल्वेगाड्यांची वाहतूक खोळंबली. शनिवारी दुपारी कामायनी एक्सप्रेस मुंबईतील लोकमान्य टिळक टर्मिनस येथून सुटली. इगतपूरीजवळ इंजिनमध्ये अचानक बिघाड झाला आणि इंजिनखालून धूर येत होता. हा प्रकार इंजिन चालकाला लक्षात आला आणि त्याने तातडीने एक्स्प्रेस थांबवली. धूर येताच एक्स्प्रेस थांबल्याने काही काळ प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण पसरले होते. प्रवाशांनीही दाखवलेले संयम आणि चालकाचे प्रसंगावधान यामुळे अनर्थ टळला.

## रमी खेळणारा क्रीडा मंत्री झाला!

**मुंबई ।** उद्धव ठाकरे यांनी कोकाटे यांना चिमटे काढले. आज एक व्यंगचित्र आले आहे. त्यात रमी आणि तीन पत्ती ऑलिम्पिकमध्ये घेण्याची मागणी होईल, असे म्हटले आहे. कारण जो विषय आहे त्या प्रमाणे खाते दिले गेले असावे. कृषिमंत्री असताना कोकाटे शेतकऱ्यांची थट्टा, मस्करी करत होते. आता रमी खेळणारा माणूस क्रीडा मंत्री झाला, असा टोला ठाकरेंनी लगावला.

### केळी भाव

| | |
|---|---|
| नवती (१) | 2000 |
| नवती (२) | 1800 |

### मिश्कीली




## सध्याचे वातावरण बेभरोशाचे झाले-मुंडे



**नाशिक ।** सध्या मी पर्यावरणमंत्री आहे. सध्या प्रदूषण करणारे उद्योग उभे राहिले आहेत. आपण कचऱ्याची सामूहिक जबाबदारी घेतली पाहिजे. आता लोकांमध्ये जागरूकता वाढली आहे. वातावरणीय बदल हे खातेसुद्धा माझ्याकडेच आहे. सध्या वातावरण बेभरोशाचे झाले आहे. राज्यात अनेक साखर कारखाने आहेत. टायर जाळून ऑइल बनविणाऱ्या कंपन्या आहेत. खाणी आणि वाळूबाबतही आम्हाला लक्ष द्यावे लागणार, अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या. राज्यात महायुतीचे सरकार असले तरी सत्तेत असलेल्या तिन्ही पक्षांत वेगवेगळ्या कारणांमुळे संघर्ष पाहायला मिळालेला आहे. मंत्र्यांचा एकमेकांच्या खात्यांतील हस्तक्षेप आणि खात्यांना मिळणारा निधी अशा वेगवेगळ्या मुद्द्यांवरून या तिन्ही पक्षांतील अनेक नेत्यांनी आतापर्यंत नाराजी व्यक्त केलेली आहे. दरम्यान, पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे यांनीदेखील माझ्या खात्याकडे बजेट नाही अशा शब्दांत आपली खदखद व्यक्त केली आहे. तसेच शासनाने आम्हाला थोडी मदत करावी, अशी मागणीही त्यांनी केलीय. पंकजा मुंडे नाशिक दौऱ्यावर होत्या. यावेळी एका कार्यक्रमात बोलताना त्यांनी माझ्या खात्याकडे निधी नाही, अशी खंत व्यक्त केली. पंकजा मुंडे सध्या पर्यावरण, हवामान बदल आणि पशुसंवर्धनमंत्री आहेत. नाशिकमधील कार्यक्रमात पंकजा त्यांच्याकडे असलेल्या खात्यांविषयी बोलत होत्या. याच वेळी बोलत असताना शासनाने आम्हाला थोडी मदत करावी. माझ्या खात्याकडे बजेट नाही, असे पंकजा मुंडे म्हणाल्या आहेत.

### नोकरीचे आमिष दाखवून फसवणूक

**पुणे ।** हजारो तरुणांना सुष्को नामक एका कंपनीने ईव्ही स्कूटरच्या मार्केटिंगचे आमिष दाखवून कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याचे उघड झाले आहे. या प्रकरणात तरुणांकडून कागदपत्रे घेऊन त्यांच्या नावावर कर्ज काढण्यात आले असून, अनेक मोठे फायनान्स कंपन्या आणि बँकांचे कर्मचारीही यात सामील असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. फसवणूक झालेल्या तरुणांनी दिलेल्या माहितीनुसार, सुष्को कंपनी सोशल मीडियावर घरबसल्या काम करा, दररोज ५,००० ते १५,००० कमवा अशा आकर्षक नोकरीच्या जाहिराती देत होती.

## मोदी, योगींचे नाव घेण्यासाठी टॉर्चर केले-प्रज्ञासिंह



**भोपाळ ।** मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणात एनआयएच्या विशेष न्यायालयाने १७ वर्षांनंतर निर्दोष मुक्तता झालेल्या माजी भाजपा खासदार प्रज्ञासिंह ठाकूर यांनी मोठा खुलासा केला आहे. तुरूंगात घालवलेल्या दिवसांबद्दल बोलताना आपला छळ करण्यात आल्याचे ठाकूर म्हणाल्या आहेत. माध्यमांशी बोलताना त्या म्हणाल्या की, एटीएस अधिकाऱ्यांनी मला १३ दिवस बेकायदेशीरपणे ताब्यात ठेवले. या काळात वेगवेगळ्या लोकांची नावे घेण्यासाठी छळ करण्यात आला. यावेळी त्यांनी ही नावे कोणती होती याबद्दल देखील माहिती दिली आहे मोदी, योगी, भागवत यांची नावे घेण्यासाठी दबाव प्रज्ञासिंह ठाकूर म्हणाल्या की, मला नरेंद्र मोदी, योगी आदित्यनाथ, मोहन भागवत, सुदर्शन, इंद्रेश, रामजी माधव सारख्या लोकांची नावे घेण्यासाठी भाग पाडले जात असे. ते म्हणत की या लोकांची नावे घेतली तर आम्ही तुला मारणार नाहीत. त्यांचा मुख्य उद्देश मला टॉर्चर करणे हाच होता. मला खोटे बोलण्यास सांगितले जात होते. त्यामुळे मी कोणाचेही नाव घेतले नाही.

भाजपाच्या माजी खासदार म्हणाल्या की, या लोकांनी छळ करून खूप काही वदवून घेण्याचा प्रयत्न केला, मात्र मी खोटे बोलले नाही. देशाला घाबरण्याची आवश्यकता नाही. देशभक्त आपल्या देशासाठी जगतो आणि मरतो. प्रज्ञासिंह ठाकूर म्हणाल्या की एटीएस अधिकाऱ्यांनी कायद्याच्या नावाखाली अनेक बेकायदेशीर कामे केली. माझा मानसिक आणि शारीरिक छळ करण्यात आला.

## गद्दार पैशाने विकले जातील, निष्ठावान नाही!

### उद्धव ठाकरेंचा शिंदे गटावर निशाणा



**मुंबई ।** अनेकजण शिवसेना आणि उद्धव ठाकरेला संपवायला निघाले होते, तरी ते संपले नाहीत. कारण आयुष्यात प्रामाणिकपणा विकत घेतला जाऊ शकत नाही. सर्वच माणसे पैशाने विकले जात नाहीत. गद्दार पैशाने विकले जात असतील, पण निष्ठावान विकले जाऊ शकत नाही, अशा शब्दात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे शनिवारी यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटावर नाव न घेता निशाणा साधला. आगामी महापालिका निवडणुकीच्या तोंडावर ठाकरे गट आणि मनसेच्या युतीची चर्चा सुरु असतानाच आज शेतकरी क्रांती संघटनेचे ठाकरे गटात विलीनीकरण करण्यात आले. ममातोश्रीफ येथे झालेल्या छोटेखानी सोहोळ्यात संघटनेचे संस्थापक अध्यक्ष भाऊसाहेब बिलेवार यांच्यासह राज्य आणि जिल्हा पातळीवरील पदाधिकाऱ्यांनी उद्धव ठाकरे यांच्या उपस्थित शिवसेनेत प्रवेश केला. त्यावेळी बोलताना ठाकरे यांनी शिंदे गट आणि भाजपला लक्ष्य केले.

आपण मोठी केलेली माणसे गेली, पण ज्यांनी त्यांना मोठे केले ती मोठी करणारी माणसे माझ्यासोबत आहेत. माझ्या आयुष्यात अनपेक्षितपणे मुख्यमंत्रिपदाची जबाबदारी मला स्वीकारावी लागली. त्यावेळी आमची कर्जमाफी करा, अशी मागणी कोणत्याही शेतकऱ्याने केली नसतानाही अन्नदात्याचे आपण काहीतरी देणे लागतो, या भावनेला जागून आपण शेतकऱ्यांना कर्जमुक्त केले, असे ठाकरे म्हणाले. लाडक्या बहिणींमध्ये अनेक बापे घुसले आहेत. हे कुणी घुसवले? पैसे कुठे गेले? असे प्रश्न उपस्थित करत लाडक्या बहिणींना मोठे स्वप्न दाखवले गेले, लोक त्याला भुलले. पण आता निवडणूक झाल्यावर त्यांचा बुरखा फाटला असून त्यांचे खरे स्वरुप दिसू लागले आहे. भ्रष्टाचाराने विद्रुप झालेले यांचे चेहरे हे आता लोकांसमोर आणायचे असून यासाठी राज्यभरात आंदोलन केले जाणार आहे. यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.



नागपूर । जागतिक बुद्धिबळ स्पर्धेत अजिंक्यपद पटकावलेल्या दिव्या देशमुखचा सत्कार करतांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सोबत नवनियुक्त क्रीडा मंत्री माणिकराव कोकाटे व अन्य.

## बीएलओ अन् पर्यवेक्षकांच्या मानधनात वाढ

**मुंबई ।** भारत निवडणूक आयोगाने मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांचे वार्षिक मानधन दुप्पट करण्याचा तसेच बीएलओ पर्यवेक्षकांचे मानधन वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. याशिवाय, मतदार नोंदणी अधिकारी (इआरओ) आणि सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी (एईआरओ) यांना प्रथमच मानधन देण्यात येणार आहे.

निवडणूक आयोगाच्या निर्णयानुसार बीएलओचे २०१५ पासूनचे मानधन सहा हजार वरून १२ हजार तर मतदार यादी पुनरावलोकनासाठी बीएलओ प्रोत्साहन रक्कम १ हजार वरून २ हजार रुपये करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे, बीएलओ पर्यवेक्षक यांचे मानधन १२ हजार वरून १८ हजार रुपये करण्यात आले आहे. एईआरओ यांना प्रथमच २५ हजार रुपये तर ईआरओ यांनाही प्रथमच ३० हजार रुपये मानधन देण्यात येईल.

याशिवाय, बिहारपासून सुरू झालेल्या या विशेष तीव्र पुनरावलोकन (एसआयआर) मोहिमेसाठी बीएलओंना सहा हजार रुपये इतके विशेष प्रोत्साहन मानधन देण्यात येणार आहे. हा निर्णय निवडणूक प्रक्रियेची अचूकता, पारदर्शकता आणि विश्वासार्हता वाढवण्यासाठी अथक परिश्रम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना योग्य मानधन देण्याच्या वचनबद्धतेचे प्रतीक असल्याचे भारत निवडणूक आयोगाने प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे. यामुळे आता निवडणूक कर्मचाऱ्यांना नवीन मानधन मिळणार आहे.

## रोहिणी खडसेंनी घेतली शरद पवारांची भेट

### प्रांजल खेवलकरप्रकरणी न्यायालयीन प्रक्रियेचा हवाला देत बोलण्यास नकार



**पुणे ।** आ.एकनाथराव खडसे यांचे जावई प्रांजल खेवलकर यांच्याशी संबंधित रेव्ह पार्टी प्रकरणाबाबत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्या रोहिणी खडसे यांनी सूचक विधान केले आहे. त्या म्हणाल्या, योग्य वेळ आल्यावर प्रत्येकाला उत्तर देणार. या प्रकरणात पुणे पोलिसांनी न्यायालयात दिलेल्या वक्तव्यांवरही त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. रोहिणी खडसे यांनी शनिवारी पुण्यामध्ये जेष्ठ नेते शरद पवार यांची भेट घेतली.

पत्रकारांशी बोलताना, रोहिणी खडसे यांनी स्पष्ट केले की, त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांची भेट पक्ष संघटनेतील महत्त्वाचे विषय आणि काही नियुक्त्यांच्या संदर्भात घेतली होती. पुणे प्रकरणाची माहिती पवार साहेबांना आहे, परंतु आजच्या भेटीचा विषय पक्ष संघटनेचाच होता असे त्यांनी नमूद केले.

त्यांचे पती प्रांजल खेवलकर यांच्या न्यायालयीन प्रक्रियेबाबत बोलताना त्या म्हणाल्या, या प्रकरणात अद्याप जामीनासाठी अर्ज केलेला नाही. परिवारातील सर्व लोक मिळून हा निर्णय घेणार असल्याचे त्यांनी सांगितले. पुणे पोलिसांनी न्यायालयात तिन्ही वेळेस वेगवेगळी वक्तव्ये केल्याचे आणि प्रिंटिंग मिस्टेक असल्याचे कबूल केल्याचे खडसे यांनी निदर्शनास आणले. न्यायालयीन प्रक्रियेबाहेर यावर वक्तव्य करणे चुकीचे आहे, असे सांगत, त्यांच्या वकिलांमार्फत न्यायालयात योग्य ती बाजू मांडली जाईल असे त्यांनी स्पष्ट केले.

खडसे यांनी सांगितले की, वकिलांनी न्यायालयात असा युक्तिवाद केला आहे की, प्रकरणातील एक मुलगी पोलिसांनीच प्लांट केली असून, हा ट्रॅप लावून खेवलकरांना अडकवण्याचा प्रयत्न केला जात आहे. ज्या दिवशी हे प्रकरण समोर आले, त्याच दिवशी एनडीपीएस कायद्याच्या कलमांतर्गतच चौकशी पान २ वर »

### तपासात सत्यता पुढे येईल-ना.रक्षा खडसे



**जळगाव ।** पुण्यातील रेव्ह पार्टीनंतर राज्यातील राजकारणात मोठी खळबळ उडाली. यावर आ.एकनाथराव खडसे यांच्या सूनबाई आणि केंद्रीय मंत्री रक्षा खडसे यांनी या प्रकरणावर शनिवारी पहिल्यांदाच भाष्य केले. या सर्व गोष्टी आता न्यायालयात गेलेल्या आहेत, पोलीस सुद्धा त्याची चौकशी करत आहे, जी सत्यता आहे ती पुढे येईल. मी सुद्धा आज केंद्रीय मंत्री म्हणून जबाबदार पदावर आहे, त्यामुळे कोणत्याही गोष्टीची सत्यता पुढे येत नाही, तोपर्यंत मला नाही वाटत की मी त्यावर प्रतिक्रिया दिली पाहिजे. मागील काही दिवसांपासून रक्षा खडसे या पुण्यातील रेव्ह पार्टी प्रकरणात काय भूमिका घेणार याकडे सर्वांच्या नजरा होत्या, शेवटी रक्षा खडसे यांनी थेट भाष्य केले आहे. रक्षा खडसे या भाजपाच्या केंद्रीय मंत्री आहेत.